MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२१६ | रविवार दि.२८ एप्रिल २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -216 | SUNDAY DT. 28 APRIL 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## पंकजाताई मुंडेंना माळी समाजाचे मतदान न देण्यासाठी ना.छगन भुजबळ यांची फुस?



माजलगाव । प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि महायुतीच्या उमेदवारी पंकजाताई मुंडे यांच्यात लढत होईल असे समजल्यामुळे ना.छगन भुजबळ यांच्या बीड येथील ओबीसी एल्गार महासभेला पंकजाताई ,ना.धनंजय मुंडे उपस्थित राहिले नव्हते त्यामुळे ना.भुजबळ यांचा इगोला धक्का बसला होता. त्यातच ना.भुजबळ यांना महायुती कडून नाशिक ची उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याची कुणकुण पंकजाताई मुंडे यांना लागली होती पण हे पंकजा मुंडेंना पचणी न पडल्याने त्यांनी दिल्ली कडे तक्रार केली होती. हा सर्व राजकिय धुर्तपणा भुजबळ यांनी ओळखुन बीड जिल्ह्यातील माळी समाजाचे मतदान पंकजाताई मुंडे यांना भेटु नाही त्यामुळे माळी समाजाच्या तरुणांना विरोधात उमेदवारी दाखल करण्याची फुस लावल्याने माळी समाजाच्या जवळपास चार-पाच जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यात विशेष म्हणजे भुजबळ यांचे बीड जिल्ह्यातील समता परीषद चे सुभाष राऊत यांच्या उपस्थितीत त्या उमेदवारां सोबत सविस्तर विचार विनिमय झाल्या नंतरच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत अशी माहिती त्यांच्याच निकटवर्तीयां कडून मिळाली आहे.

# गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा जोरात







- पोलीस प्रशासन व महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष!
- पोलीस कर्मचारी आणि महसूल कर्मचाऱ्यांकडून वाळू माफियांना बळ!
- गेवराई, चकलांबा, तलवाडा पोलीस ठाण्याच्या कर्मचारी आणि महसूल विभागाने वाळू माफियांना परवाना दिला आहे का? नागरिकांतून संतप्त सवाल..?
- बेकायदा वाळू उपशामुळे शासनाचा कोट्यवधी रूपयांचा निधी बुडाला; महसूल विभागाकडून डोळेझाकपणा
- वाळू माफिया यांच्यात संगनमत करून महसूल कर्मचाऱ्यांसह पोलीस कर्मचारी मालामाल!
- वाळू उपशामुळे नदीपात्रात मोठमोठे खड्डे पडल्याने ग्रामस्थांसाठी जीवघेणे ठरणार!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात दिवसाढवळ्या अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणात केला जात आहे. याकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने वाळूमाफियांचे मनोबल वाढले आहे.

तालुक्यातील राक्षसभुवन, सावरगाव, म्हाळसपिंपळगाव, राजापूर, सावळेश्वर, पांढरीसह विविध भागातील गोदापत्रातून वाळू माफिया बेसुमार वाळू उपसा करतात. यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे. वाळूचा उपसा झाल्यामुळे गोदावरी नदीपात्रात खड्डे झाले आहेत. याकडे मात्र महसूल आणि पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीचे पात्र गेलेले आहे. नदी काठावरील भागात गेल्या अनेक वर्षापासून वाळू माफिया मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचा उपसा करतात. अवैध वाळू चा विरोधात महसूल व पोलीस प्रशासनाकडून केवळ थातूरमातूर कारवाई करण्यात येते. मात्र, कारवाईनंतर पुन्हा जोशाने वाळू उपसा केला जात असल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. हायवा, ट्रॅक्टर, केनीद्वारे खुलेआम वाळू उपसा करून माफिया लाखो रुपये कमावतात. बेसुमार वाळू उपसा केल्यामुळे नदीपात्रात खड्डे पडल्याने गोदावरीचे पात्र धोक्यात आले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत असून, शासनाने अवैध उपसा बंद करावा अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांमधून होत आहे.



दरम्यान तहसील कार्यालय राक्षसभुवन फाटा, म्हाळसपिंपळगाव फाटा, गुंतेगाव चौफुलीसह विविध ठिकाणी वाळू माफियांना लोकेशन सांगणारे तरुण दिवसभर बसलेले असतात. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे

वाळू माफियांना पोहोचण्याचा काम प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून होत आहे. अनेक छोटे मोठे कर्मचारी हेच लोक वाळू माफिया यांच्यात हजर असतात. वाळू माफीया यांची सेवा करण्यासाठी व फोन वरती लोकेशन देऊन सर्वांना कोण टाकणार आहे. कारवाईला कोण येत आहे हे सर्व लोकेशन देत आहेत. तर यामध्ये कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांचे व कर्मचाऱ्यांचे वाहन वाळूमाफिया चालून त्या कर्मचारी अधिकारी पोलीस प्रशासनातील कर्मचारी महसूल प्रशासनातील कर्मचारी यांची सुद्धा वाळू माफिया सोबत हात मिळवणे असून त्यांचे सुद्धा यावेळी अवैध वाहतूक करणारी वाळूचे टिप्पर ट्रॅक्टर गाड्या स्वतःच्या आहेत. ह्या दुसऱ्याच्या नातेवाईकाच्या नावावर त्या गाड्या घेऊन ते संबंधित वाळू उपसा पोलीस कर्मचारी महसूल प्रशासनाची कर्मचारी करत आहेत. ही बाब प्रशासनाच्या लक्षात येत नाही का गेवराई चकलांबा, तलवाडा या भागामध्ये वाळू उपसा रात्रीच्या वेळी रात्रभर चालू असतो. या वाळू उपशाला कोणाची बंदी अथवा कोणाची जात राहिलेला नाही. पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यामध्ये वाळू माफिया सोबत हात मिळवून आपले खिसे भरण्यामध्ये माहीर आहे. तर शासनाचा कोट्यवधी रुपयाचा निधी वाळू उपसाच्या माध्यमातून येणारा कोट्यवधी रुपयाचा महसूल आज उडत आहे.

**गेवराई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रवीणकुमार बांगर, तलवाडा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सोमनाथ नरके व चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे व महसूल विभागाचे आणि वाळू माफिया यांच्यात आर्थिक तडजोड होत असल्याने गेवराई तालुक्यातून अवैध वाळू उपसा जोरात सुरू आहे. तालुक्यात दररोज रात्री अपरात्री अवैध वाळू हायवा, ट्रॅक्टरच्या माध्यमातून त्याची वाहतूक केली जात आहे. महसुल व पोलीस प्रशासनाने कारवाया केल्या पण त्या तेवढ्यापुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. वाळू माफियात व पोलीस प्रशासनात संगनमत असल्याने अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे**

व तोच चोरांच्या खिशामध्ये जात आहे. यामध्ये गेवराई तहसीलचे तहसीलदार खोमणे व डीवायएसपी राजगुरू यांनी यामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे परंतु असे न होता त्यांनी यावेळी वाळूमाफियांना पोचण्यासाठी आपल्याच कर्मचाऱ्यांची पाठराखण करणारे तहसीलदार खोमणे व डीवायएसपी राजगुरू यांची भूमिका असल्याची गोदाकाठाच्या सर्व गावांमध्ये नागरिकांतून चर्चा चालू आहे.

# पंकजाताई मुंडेंचा मार्ग मोकळा, ज्योती मेटेंची मोठी घोषणा

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत बीड मतदारसंघातून दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे निवडणूक लढणार अशी शक्यता वर्तवली जात होती. पण आता लोकसभा निवडणुकीत शिवसंग्राम पक्ष महायुती किंवा महाविकास आघाडी कोणालाही समर्थन देणार नाही. लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहण्याचा निर्णय राहणार आहे. अशी माहिती शिवसंग्राम पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्राम पक्षाची भूमिका ठरवण्यासाठी राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या मंथन बैठकीचे आयोजन पुण्यातील बाळासाहेब ठाकरे



सभागृहात शनिवारी करण्यात आलं होतं. त्यानंतर मेटे पत्रकारांशी बोलत होत्या.

'लोकनेते विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर प्रथमच लोकसभा निवडणूक होत आहे. बीड लोकसभेच्या अनुषंगाने भूमिका जाहीर करण्याचा निर्णय यापूर्वीही झाला होता. त्यामुळे तटस्थतेचा निर्णय घ्यायला उशीर झाला असं नाही. आता सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून लोकसभेसाठी तटस्थ राहण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राजकारणात अनुषंगिक भूमिका असतात. त्यामुळे नाराजीचा प्रश्न उपस्थित होत नाही. योग्यवेळी योग्य निर्णय घेण्यालाच राजकारणात महत्व असते. आमचीही भूमिका अशीच होती. लोकसभा निवडणूक लढवण्याबाबत बीडच्या जनतेची इच्छा होती. त्यामुळे आमच्या संघटना पातळीवर हा विचार झाला होता. जनतेचा सन्मान करण्याच्या अनुषंगाने बीडमध्ये लोकसभा निवडणूक लढवणार नाही अशी भूमिका जाहीर केली होती. कारण यासाठी आम्ही लोकसभा क्षेत्रात सखोल चाचपणी करून त्यानांतर जनतेच्या हिताचा आदर करण्यासाठी आम्ही लोकसभेतून माघार घेतली.' अशी घोषणा ज्योती मेटेंनी केली.

तर, 'लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर आम्ही पुन्हा राज्य कार्यकारिणीची बैठक घेऊ. यानंतर विधानसभेची तयारी केली जाईल. शिवसंग्राम विधानसभेच्या १२ जागा लढवणार आहे, हे आम्ही याआधीही जाहीर केले आहे. विधानसभेच्या दृष्टीने जी काही रणनीती आखावी लागेल, यासाठी ज्या पक्षांची मदत घ्यावी लागेल किंवा ज्यांच्यासोबत युती करावी लागेल याचाही विचार योग्यवेळी केला जाईल. आम्ही महायुतीमध्ये होतो, हा भुतकाळ आहे. नाराजीचा प्रश्न नसून सगळ्यांशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे. आम्ही मतदान करणार पण कोणत्याही पक्षाला पाठिंबा देणार नाही' असं तानाजीराव शिंदेंनी स्पष्ट केलं.


# धक्कादायक! दोन विद्यार्थ्यांची प्राध्यापकाला रॉडने मारहाण

गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

औरंगाबाद डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बीएससीच्या परीक्षा सुरू आहेत. यापरीक्षेदरम्यान, एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रश्नपत्रिका दिली नाही म्हणून दोन विद्यार्थ्यांनी प्राध्यापकाला रॉडने मारहाण केली. पोलिसांनी या दोन्ही विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. तसंच, गंभीर जखमी झालेल्या प्राध्यापकाला सध्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बीडच्या शिरुर तालुक्यातील श्रीपत वाडी येथे भगवान बाबा महाविद्यालयात दोन विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांना रॉडने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे परीक्षा केंद्रावरील इतर शिक्षकांनी संताप व्यक्त केला आहे.




### नेमकं घडलं काय?

भगवान बाबा महाविद्यालयामध्ये प्राध्यापक अशोक वारे हे परीक्षा केंद्रावर असताना राहुल गर्जे आणि गंगाधर गर्जे या दोन विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका का दिली नाही म्हणून प्राध्यापक अशोक वारे यांना रॉडने मारहाण केली. या मारहाणीत अशोक वारे हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना शिरोळ येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती ठीक असून मारहाण करणाऱ्या दोन्ही विद्यार्थ्यांवर शिरुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांनीही तत्काळ या घटनेची गंभीरतेने दखल घेत विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसंच पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# मराठाबहूल गावांनी दिला पंकजाताई मुंडेंना शब्द

## प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ताई, तुमचं नेतृत्व सर्वमान्य आहे, तुमच्याकडे विकासाचं एक व्हिजन आहे. तुम्ही अठरापगड जातींना सोबत घेऊन काम करता, त्यामुळे तुमच्यासारख्या नेतृत्वाची आज जिल्हयाला गरज आहे, तुम्हाला प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी आम्ही कठोर मेहनत घेऊ अशा शब्दांत मराठाबहूल गावांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी आपला निर्धार व्यक्त केला. तथापि, माझ्या गॅरंटीवर विश्वास ठेवा, तुमच्या न्याय हक्कासाठी मी मागे हटणार नाही असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला.

पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी घाटनांदूर, पट्टीवडगांव, जवळगाव, पुस, वाघाळा तसेच बर्दापूर सर्कलमधील गावांचा दौरा करून मतदारांच्या गाठीभेटी घेत थेट संवाद साधला त्यावेळी मतदारांनी त्यांच्या विजयाचा आपला निर्धार स्पष्टपणे बोलून दाखवला. हा भाग माझ्या हक्काचा आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या



राजकारणाची सुरवात इथूनच झाली, त्यांचेवर तुम्ही जीवापाड प्रेम केलं. त्यांच्यासारखं कणखर नेतृत्व तुम्ही निर्माण केलं, त्यांच्या पश्चात माझ्या पाठिमागेही तुम्ही ताकद उभी केली. आज मी लोकसभेसाठी उभी आहे. मी उमेदवार म्हणून कशी आहे?मला कशामुळे मत देणार? असा सवाल त्यांनी केला. यावर उपस्थितांनी त्यांच्या जमेच्या बाजू सांगून विकास करण्याची धमक केवळ तुमच्यामध्ये आहे असे म्हटले, यावर त्या म्हणाल्या, मला मतं देण्याची दहा कारणं असतील पण द्यायच नाही यासाठी कोणतच कारण नाहीय. निवडणूकीत विरोधक माझेवर कोणतेही आरोप करतील. त्यांचेकडे दुसरे मुद्दे नाहीत. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना ते बुध्दीभेद करून भिती घालतात, पण अशांना बळी पडू नका.

# नांदा गावचे भूमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे यांना वीरमरण

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यांतील नांदा गावचे भुमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे (६६आर्मड रेजिमेंट) हवालदार वय ४४ होते, जम्मु काश्मिर, कोलकत्ता, बंगलोर, राजस्थान, हरियाणा देशात विविध ठिकाणी २४ वर्ष सेवा केली ,अल्पशा आजाराने कमांडो हॉस्पिटल पुणे येथे २६/०४/२०२४ रोजी वीरमरण आले,भारत मातेच्या वीर सुपुत्रास भावपुर्ण श्रद्धांजली देण्यात आली.शुक्रवारी संध्याकाळी माहिती धडकताच नांदा गांवासह संपूर्ण पंचक्रोशी शोक सागरात बुडाली,आष्टी तालुक्यांत नांदा गावातील भुमीपुत्र विष्णु रघुनाथ औटे हे सन २००१ मध्ये आर्मी भरती झाले होते.नांदा गावचा सुपुत्र शहीद झाल्याचे समजताच औटे परिवारांसह पंचक्रोंशीवर शोककळा पसरली होती.यांच्या घरी



पोहोचले,त्यांनी शहीद कुटुंबियांचे सांत्वन केले,या जवानाचे पार्थिव शनिवारी संध्याकाळी नांदा गावांत पोहोचल्यानंतर आष्टी तालुक्यातील व नांदा गावांतील आजी-माजी सैनिक तसेच सर्व नांदा आ.जिप.सदस्य,पं,स,सदस्य,ग्रामस्थ,पोलीस पाटील,सरपंच उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य,सर्वच माता बहिणींनी भारत माता की जय,अमर रहे अमर रहे विष्णु औटे अमर रहे! जड अंतकरणाने घोषणा दिल्या.त्यानंतर सजवलेल्या लष्करी वाहनांतून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली त्यानंतर शहीद जवान विष्णु औटे यांना बीड जिल्हा पोलीस प्रशासनाकडूंन तसेच लष्करी विभागाकडूंन अखेरची मानवंदना देत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,मुलगा,भाऊ,आई असा परिवार आहे





बीड । प्रतिनिधी

बीड-पिंपळनेर रस्त्यावर नागपूर फाट्याच्या नजीक रानुबाई नगर जवळ टेम्पो आणि मोटरसायकलस्वाराचा जोरदार अपघात झाल्याची घटना आज दि. २६ रोजी घडली. या आपघातात मोटरसायकलस्वर ठार झाला आहे. या अपघातात ठार झालेल्या गोविंद श्रीकीसन घोलप (रा. उमरी, ता. जि. बीड) असे मोटरसायकल चालकाचे नाव आहे. सदरील माहिती पिंपळनेर पोलिसांनी दिली आहे.टेम्पो आणि मोटरसायकलची जोरदार धडक झाल्याची माहिती बीड पिंपळनेर रस्त्यावरील अपघात स्थळावरील प्रथम दर्शनींकडून सांगण्यात आले. अपघातात मोटरसायकलचा चक्काचूर झाल्याचे निदर्शनास आले.



बीड लोकसभेच्या उमेदवार मा. पंकजाताई मुंडे यांच्या प्रचार दौऱ्यानिमित्त काळवटी तांडा येथे डॉ.प्रीतम ताई मुंडे, आ.नमिता ताई मुंदडा आल्या असता त्यांचे अभुतपूर्व स्वागत करण्यात आले.

# समाजातील मूळ समस्या महिलांच्या राजकारणातील सहभागामुळेच सुटतील - डॉ. पूनम महाले

दि. २७ एप्रिल- केज प्रतिनिधी: प्राचीन काळापासून समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते. शिवाय भारतीय संस्कृती ही पितृप्रधान आहे. समाज अत्यंत रुढीप्रिय होता. तसेच परंपरेने चालत आलेल्या विघातक व अनिष्ट प्रथेमुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत दयनिय बनले होते. शिक्षण, मतदान व वारसा हक्क हे अधिकार देखील त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात मिळाले. आजही स्त्रियांना अनेक समस्या व संकटाना सामोरे जावे लागते. दुष्टपीपणा, लहरीपणा, व्यसनाधिनता, दुराचार, लैंगिक अत्याचार तसेच वर्चस्व लादण्याचा प्रयत्नामुळे स्त्री स्वअस्तित्वाला विसरुन गेलीय. २१ व्या शतकातही त्यांचे अस्तित्व पुरुषांच्या हाती आहे. तेंव्हा समाजाची मानसिकता बदलण्यासाठी स्त्रियांनी स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले पाहिजे. स्त्रियांनी आत्मविश्वास व अद्यायावत तंत्रज्ञान अवगत केले पाहिजे. यासाठी महिलांनी राजकारणामध्ये सक्रिय झाले पाहिजे. कारण समाजातील मूळ समस्या महिलांच्या राजकारणातील सहभागामुळेच सुटतील. असे प्रतिपादन डॉ. पूनम महाले यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २७ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे समारोपाचे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. पूनम महाले महाले डायग्नोस्टिक अँड आयकेअर सेंटर, नाशिक तर अध्यक्षा म्हणून डॉक्टर योगिनीताई थोरात ईशान हॉस्पिटल, तथा मा. सदस्य जि. प. बीड या उपस्थित होत्या. इतर मान्यवरांमध्ये जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष, अंकुशरावजी इंगळे उपाध्यक्ष डॉ. पांडुरंग तांदळे, संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, नारायण अण्णा अंधारे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, प्राचार्य उपेंद्र कोकिळ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी लाभलेल्या उपस्थित पाहुण्यांचा परिचय सौ. अपर्णा देशपांडे मॅडम यांनी दिला. सातवी पुष्प गुंफताना राजकारणात महिलांचा सहभाग या विषयावर बोलताना डॉ. पूनम महाले पुढे म्हणाल्या, आज समाजाची अशी ही मानसिकता आहे की, मुलींना जर स्वातंत्र्य दिले तर त्यांना त्यांच्या मर्यादांचा विसर पडेल. समाजातील वाढत्या अत्याचाराला त्या बळी पडतील. म्हणूनही त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली जात आहेत. परंतु स्त्रियांनीही समाजाची मानसिकता बदलण्यासाठी स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले पाहिजे. याकरिता महिलांनीही राजकारणामध्ये सहभागी होणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्षीय समारोपात डॉ. योगिनीताई थोरात म्हणाल्या, आजच्या काळामध्ये स्त्रियांना स्वतःच्या हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. स्त्रीयांनी मानसिक गुलामी सोडली पाहिजे. मुलींच्या जीवनशैलीवर बंधने व मुलांना स्वातंत्र्य असे का. तिलाही आत्मसन्मानाचे धडे द्या. स्त्रियांना दुय्यम लेखनं ही पुरुषांची मानसिकता आपण बदलली पाहिजे. राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, या पराक्रमी तर होत्याच परंतु त्या उत्तम राजकारणी ही होत्या. त्यांच्या कर्तुत्वातून त्यांचा दूरदृष्टीपणा दिसून येतो. राजमाता जिजाऊ राजकारणी नसत्या तर स्वराज्य निर्माण झालं नसतं. कारण त्यांनीच शिवरायांना बालपणी पराक्रमी राजांचे शौर्य, रामायण महाभारतातील कथा सांगितल्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या आजचे राजकारण अत्यंत रसातळाला गेले आहे, राजकीय व्यक्तींना सुसंस्कृतपणा, सभ्यता या गोष्टींचा विसर पडला आहे. तसेच सर्वसामान्य व्यक्तींचा राजकारणामध्ये सक्रिय सहभाग नसल्याने, चुकीच्या व्यक्तींना संधी मिळतेय. तेंव्हा राजकारणाचे पायदंड बदलले



पाहिजेत.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. शिवनंदा मुळे यांनी केले तर आभार व्यक्त करताना सौ. शैलाताई इंगळे यांनी यावर्षी २४ व्या वर्षात पदार्पण केलेल्या स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेसाठी निमंत्रित सन्माननीय व्याख्याते व अध्यक्षांचेही मनःपूर्वक आभार मानले. तसेच या कार्यक्रमाला आपल्या दैनिकातून प्रसिद्धी देऊन सहकार्य केलेल्या सर्व पत्रकार बंधूंचेही मनःपूर्वक आभार व्यक्त केले.



गेवराई(शेख जावेद)आज रोजी पोलीस स्टेशन गेवराई व स्थानिक गुन्हे शाखा पथक यांनी संयुक्त अवैध देशी विदेशी दारूची विक्री करणारे साईनाथ महादेव ढाकणे (२७) यांचेकडून त्याचे सह्याद्री हॉटेल मध्ये देशी विदेशी दारूचा एकूण ८७०० रू मुद्देमाल जप्त करण्यात आला असून फिर्यादी विकास कैलास वाघमारे यांचे तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हर्षवर्धन खाकरे यांच्या 'सिंडिकेट' लघु चित्रपटावर कौतुकाची थाप

## महाविद्यालयाने सन्मानचिन्ह देवून केला सन्मान

मोताळा (प्रतिनिधी)

तालुक्यातील मुर्ती येथील हर्षवर्धन खाकरे हा पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात हर्षवर्धन संजय खाकरे याने आपल्या सहकारी मित्राच्या सहकार्याने दोन मित्रांच्या मित्र प्रेमावर आधारीत 'सिंडिकेट' हा १६ मिनिट ८ सेकंडचा लघु चित्रपट सादर केला. या लघुपटाला महाविद्यालयाच्यावतीने सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या सुप्त कला-गुणांना वाव देण्यासाठी



पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे १७ ते १९ एप्रिलच्या दरम्याने स्नेहसंमेलन आयोजीत करण्यात आले होते. येथे हर्षवर्धन खाकरे याच्या मार्गदर्शनाखाली द्वितीय वर्षाचे विद्यार्थी आदित्य बने, श्रीकांत लाखे, शेख सैलानी, कदम कैलास, विक्रम देवकर, विनय गायकवाड, गौरव जाधव, अभय चव्हाण, महेश फरतडे, प्रसाद कनके, प्रल्हाद फड, नरेंद्र बोडके, सुरज काळे, लोकेश रेड्डी, महेश हाके, प्रणव पुप्पलवाड यांनी सदरच्या काल्पनिक लघु चित्रपटात आपला अभिनय सादर केला. चित्रपट तयार करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कॅमेरे व प्रशिक्षण नसतांना हर्षवर्धनने मित्राच्या सहकार्यने सदरच्या लघु चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले.१६ मिनिट ८ सेकंडचा लघु चित्रपट तयार करण्यासाठी तीन दिवस लागले असून लघु चित्रपट तयार करण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी लागला.या लघुपटाला मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.यावेळी विद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.एन.झेड.गायकवाड,डेअरी टेक्नॉलॉजी कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.एम. आर.पाटील,डॉ.संतोष इरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# १६ महिन्यांत लाचखोरीचे ३८ गुन्हे

## पैसे स्वीकारताना ६० जण अटकेत, पोलिस विभाग कारवायांमध्ये दुसऱ्या स्थानी

बीड / प्रतिनिधी

सरकारी कार्यालयात कर्मचाऱ्यांना असलेला वरकमाईचा मोह आणि टेबलाखालून लक्ष्मीदर्शन झाल्याशिवाय कामाला येत नसलेली गती यामुळे नागरिकांना लाचखोरीचा सामना करावा लागतो. मात्र, सजग नागरिकांनी लाच न देता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेत दिलेल्या तक्रारींमुळे गतवर्षी २०२३ मध्ये २९ गुन्हे नोंद झाले यात ४० सरकारी कर्मचारी व ११ खासगी व्यक्ती जाळ्यात अडकले. २०२४ मध्ये २५ एप्रिल अखेर ९ सापळे झाले असून यात ११ सरकारी कर्मचारी व ५ खासगी व्यक्ती जाळ्यात अडकल्या आहेत.

४ महिन्यांतील कारवायानुसार, लाचेखारीत महसूल विभाग अव्वल असून पोलिस विभाग दुसऱ्या स्थानी आहेत. एक उपजिल्हाधिकारीही लाचेच्याा प्रकरणात अडकल्या आहेत.

कामासाठी नडलेले अनेक जण या दबावाला, मागणीला बळी पडून सरकारी कर्मचाऱ्यांची लक्ष्मीदर्शनाची आस पुरवतात. मात्र, अनेक सजग नागरिक या विरोधात थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे जाऊन त्यांची तक्रार करतात. गत आठवड्यात जिल्ह्यात तलवाडा ठाण्यातील दोन पोलिस कर्मचारी, दोन खासगी व्यक्ती आणि पाठोपाठ एक तलाठी लाचेच्या जाळ्यात अडकला होता. त्यामुळे लाचेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. एसीबीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सन २०२३ मध्ये जिल्ह्यात २९ सापळे झाले होते. यामध्ये ४० सरकारी कर्मचारी आणि ११ खासगी व्यक्तींना ताब्यात घेतले गेले होते. जानेवारी ते २५ एप्रिल २०२४ या सुमारे ४ महिन्यांच्या काळात ९ सापळे झाले असून ११ सरकारी कर्मचारी आणि ५




खासगी व्यक्तींना ताब्यात घेतले गेले आहे.

यात, लाच घेताना व लाच मागणी सिद्ध झाल्याने गुन्हे नोंद केले गेलेले आहेत. एकूण १६ महिन्यांत ३८ कारवायांमध्ये ६० जणांना एसीबीने ताब्यात घेतले आहे. कुठे कराल लाचखोरीची तक्रार लाचखोरीबाबत तक्रार करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा १०६४ हा टोल फ्री क्रमांक आहे. या शिवाय, बीड एसीबी कार्यालयाचा ०२४४२-२२२६४९ या क्रमांकावरही तक्रार करता येऊ शकते. या शिवाय अधिकाऱ्यांच्या मोबाईलवरही तक्रार करता येईल. किंवा प्रत्यक्ष कार्यालयात जाऊनही तक्रार करता येते.

कोणीही कोणतेही काम करण्यासाठी पैशांची किंवा इतर स्वरुपात लाचेची मागणी करत असेल तर नागरिकांनी पुढे येऊन एसीबीकडे तक्रार करावी. पडताळणी करुन कारवाई केली जाते. यात, तक्रारदाराचे नाव, माहिती गोपनीय ठेवली जाते. - शंकर शिंदे, उपअधीक्षक, एसीबी, बीड

उपजिल्हाधिकारीही लाचेत अडकल्या

परिक्षेत्रात बीड दुसऱ्या स्थानी लाचेच्या सापळ्यांमध्ये बीड जिल्हा छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात दुसऱ्या स्थानी आहे. २०२४ मध्ये संभाजीनगर जिल्ह्यात सर्वाधिक १५ सापळे झाले. त्यानंतर बीड जिल्ह्यात ९, धाराशिव जिल्ह्यात ८ आणि जालना जिल्ह्यात ७ कारवाया झाल्या आहेत. बीड जिल्ह्यात गतवर्षी याच काळात १० कारवाया झाल्या होत्या. जिल्ह्यात २०२४ मधील चार महिन्यांत झालेल्या कारवायात महसूल विभागातील सर्वाधिक लाचखोर पकडले गेले. ११ जणांपैकी महसूल विभागाचे ५ लाचखोर आहेत. या उपजिल्हाधिकारी भारती सगरे यांच्यासह दोन महसूल सहायक, दोन तलाठी यांचा समावेश आहे. तर, १ ग्रामसेवक, बांधकाम विभागातील १, पोलिस विभागातील ३ जण तर पाटबंधारे विभागातील १ जण अटक आहे. तर, ११ खासगी व्यक्तीही जाळ्यात अडकल्या आहेत.

# पंकजाताईंच्या रुपाने जिल्ह्याचा विकास पाहूया एक मत पंकजाताई मुंडेंना देऊया - डॉ ऋषिकेश विघ्ने

**जातीपातिच्या राजकरणाला लाथ देऊन जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताईंना निवडून देण्याचा युवकांचा निर्धार**

**पंकजाताईंना लोकसभेत पाठवून बीड जिल्हा सुजलाम सुफलाम करायचाय - डॉ ऋषिकेश विघ्ने**

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीच्या उमेदवार भाजपा सचिव मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना भरघोस मताधिक्याने निवडून देऊन देशाचे सक्षम नेतृत्व माननीय नरेंद्र मोदीजी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्यासाठी, मा.मोदीजींचे हात बळकट करण्यासाठी, देशाच्या विकासासाठी भाजपाचे कणखर नेतृत्व मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जातिवादाला थारा न देता बहुमताने विजयी करावे असे आव्हाहन पाटोदा तालुका महायुतीचे डॉ ऋषीकेश विघ्ने यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात सध्या काही अदृश्य शक्ती जातीच्या नावाखाली मत मागण्याचं काम करत आहेत परंतु जनता एवढी मूर्ख नाही की जातीपातीच्या राजकारणावर विश्वास ठेऊन मतदान करायला आता शेतकरी, कामगार,



डॉक्टर्स, युवक-युवती यांनी यंदा पंकजाताई मुंडे यांना लोकसभेच्या सर्वोच्चसभागृहात खासदार म्हणून पाठवायचे ठरवले आहे. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना लाखोंचा पिकविमा शेतकऱ्यांना दिला त्याची आजही आठवण बीडजिल्ह्यातील शेतकऱ्यांना येते. भारताचे पंतप्रधान यांनी सुरु केलेला पीएम किसान निधी व राज्याचा वाटा मिळुन वार्षिक १२ हजार रुपये शेतकऱ्याच्या सन्मानार्थ दिले जातात. महिलांना उज्वला योजने अंतर्गत मोफत गॅस वाटप करण्यात आला व गॅस घेतल्यावर ३०० रुपये अनुदान थेट आधार लिंक खात्यात जमा होते हे देखील खूप अभिमानास्पद कार्य पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. बीड जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे जाळे डॉ प्रितमताई मुंडे खासदार असताना निर्माण केले गेले त्यामुळे जिल्ह्यातील दळणवळणाचा मार्ग एकदम सुखकर झाला आहे. ह्यावेळेस पंकजाताई मुंडे यांना आपण खासदार म्हणून दिल्लीच्या तख्तावर पाठवले तर बीड जिल्ह्याचे नाव देशात गाजल्याशिवाय राहणार नाही असे मत भारतीय जनता पार्टी चे नेते डॉ ऋषिकेश विघ्ने यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे.

# बोरफडी गावात अवैध चोरटी दारू विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**दहा हजार रुपयांचा अवैध देशी दारूचा मुद्देमाल जप्त**

गेवराई । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रीक निवडणूक-२०२४ सुरळीत व शांततेत पार पडाव्यात म्हणून जास्तीत जास्त अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आदेश दिलेले आहेत. त्यावरून संतोष साबळे पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी आपल्या अधिपत्याखालील पथकाला तसे आदेश दिल्या वरून पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे यांचे पथक दिनांक २८/०४/२०२४ रोजी भल्या पहाटेपासूनच अवैध धंदे करणाऱ्यांची माहिती काढत पिंपळनेर हद्दीत गस्त करत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली की,बोरफडी गावातील बस स्टँड वरील हॉटेल धुळदेव च्या पाठीमागे एक इसम अवैधरित्या दारूची विक्री करत आहे,अशी बातमी मिळाले वरून बातमीचे ठिकाणी सकाळी ०९.३० वाजता एलसीबीच्या पथकाने छापा टाकला असता त्या ठिकाणी इसम



नामे भिवाजी भास्कर खांडेकर रा.बोरफडी ता. जि.बीड हा देशी दारू बाबी संत्रा कंपनीच्या २१३, ९०-ढ च्या बाटल्या किंमती १०,६५०/-रू.चा मुद्देमाल जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यास मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध पोलीस हवलदार राहुल शिंदे यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास कामी पोलीस ठाणे पिंपळनेर यांचे ताब्यात देण्यात आल्याने डउइ पथकाचे बोरफडी गावात व परिसरात जनतेतून कौतुक होत आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोलीस उप निरीक्षक श्री.सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/ तुळशिराम जगताप, पोह/ पी.टी.चव्हाण, पोह/ विकास राठोड, पोह/राहुल शिंदे, पोना/ बाळु सानप, चालक पोशि/ नामदेव उगले यांनी केलेली आहे.

# खालापूरी येथील पाण्याचा प्रश्न एकच दणक्यात सोडवला- डॉ. जितीन वंजारे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील खालापूरी या ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई होती,येथील जनतेला शंभर दोनशे रुपये खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत असे,पुरता गाव या दुष्काळाला कंटाळला होता पण राजकीय गुलामीतून लोक सगळं निमूटपणे सहन करताना दिसले काही युवक भडकले काहींनी तीव्र भूमिका घेतली यातच सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी हंडा मोर्चा ग्रामपंचायत आणि मा.तहसील कार्यालयावर काढू अशी तिखट भूमिका घेताच दिलेल्या पाच दिवसाच्या आत गावात टँकर चालू झाले.ग्रामिन पेयजल योजना ,जलस्वराज्य योजना,पाणीपुरवठा योजना अश्या अनेक योजना राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या चालू असून येथील पुढाऱ्यांना त्याची अंमलबजावणी पण होय नसेल तर आपापल्या संविधानिक पद सोडा असाही इशारा यावेळी डॉ जितीन वंजारे यांनी दिला होता याची गंभीर दखल घेत गावाला ग्रामपंचायत ने पाणी पुरवठा चालू केल्या याबद्दल गावकऱ्यांनी आणि डॉ जितीन वंजारे यांनी आभार



मानले.माझ्या मागणीला यश मिळाले पाण्याचे टँकर सुरू झाले त्याबद्दल धन्यवाद खालापूरी ग्रामपंचायत आणि सर्वच कर्मचारी

खालापूरी गावात पाण्याचा मोठा प्रश्न होता सप्ताह निमीत्त गावाकडे जाणार असल्यामुळे गावातील परिस्थितीचा आढावा घेतला असता गावात पाण्याचा प्रश्न गंभीर असलेला दिसला त्यावर आवाज उठवला हंडा मोर्चा काढनार असल्याचे सांगताच गावात टँकर चालू झाले. धिम्म शासन-प्रशासन आणि ग्रामपंचायत वर कानात आवाज काढला की यंत्रणा जागी झाली काल गावात टँकर आले.मनोमन आनंद झाला छोट्या छोट्या गोष्टीची परिपूर्तता केली जात नाही त्यामुळे शासनाच्या योजना प्रभावीपणे गोर गरीबांपर्यंत पोहचत नाहीत हे आपलं दुर्भाग्य गावात सरपंच उपसरपंच सदस्य होन सोप्प आहे पण सामाजिक कार्य करण्याची उमेद पोटातूनच असावी लागते.गावात पाण्याचा भयंकर प्रश्न आजपर्यंत लांबवत ठेवला ही धीरगंभीर गोष्ट आहे पाण्याचं महापाप कोणीही करू नये.गावातील युवा,कार्यकर्ते आणि गावकऱ्यांनी आपल्या हक्क आणि अधिकार याकडे दुर्लक्ष करता कामा नये ......!

पाणी च नाही तर आपल्याला सगळा गाव सुजलाम सुफलाम करायचा आहे.शासनाची प्रत्येक योजना प्रभावीपणे राबवणार आहोत.माझी सत्ता असेल नसेल पण सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहू .कामाचा दर्जा पूर्णत्वाने १००% गुणवत्ता दर्शक करून घेऊ.बाकी सत्ता कोणाच्याही हातात असो लोकांच्या समस्स्यांचे निराकरण करण्यासाठी अर्ध्या रात्री मी मा.सम्राट डॉ जितीन दादा वंजारे खालापूरीकर तत्पर असतो,आहे आणि भविष्यातही राहील .

# माजलगावात दीक्षार्थी अंजली जैन यांची भव्य शोभायात्रा

**ढोल-लेझीम पथक, संगीतकार अनुप जैन यांच्यासह जल्लोषात मुमुक्षुची शोभायात्रा**

माजलगाव । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरची कु.अंजली जैन यांचा जैन परंपरेनुसार 'जैन भागवती दीक्षा महोत्सव' सोहळा माजलगाव येथे आज रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी होणार आहे. याच अनुषंगाने काल दिनांक २७ एप्रिल रोजी माजलगाव नगरीतून दीक्षार्थी मुमुक्षु कु.अंजली जैन यांची भव्य अशी शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पाथर्डी येथील ढोल पथक, मुलींच्या लेझीम पथक यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच सुप्रसिद्ध संगीतकार अनुप जैन यांची प्रस्तुती देखील या शोभायात्रेदरम्यान होती. दिनांक २८ एप्रिल २०२४ रोजी शिवप्रताप मंगल कार्यालय येथे होणाऱ्या जैन भागवती दीक्षा महोत्सवानिमित्त जैन धर्माचे २५ साधु साध्वी माजलगाव नगरीमध्ये आलेले असून यांच्या मार्गदर्शनानुसार माजलगावातील मुख्य रस्त्यावरील संभाजी महाराज चौक ते राजस्थानी मंगल भवन इथपर्यंत दीक्षार्थी कु.अंजली जैन यांची भव्य अशी शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली होती. कु.अंजली जैन यांना गुरु गणेश रथामध्ये बसवून



माजलगावकरांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. यावेळी महिलांनी कळस घेऊन शोभायात्रेत सहभाग नोंदवला तसेच लहान मुले, पुरुष मंडळी, युवक मंडळ यांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व त्यांनी नाचत - गात आणि घोषणा देत अंजली ला संयम पथावर जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शोभायात्रेदरम्यान विविध ठिकाणी अंजली जैन यांनी वर्षीदानही केले. तसेच विविध ठिकाणी समाजातील काहींनी शोभायात्रीतील भाविक भक्तांसाठी पाण्याची व थंड पेयाची सोय सुद्धा केली होती. यावेळी कुठलीही वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणार नाही व कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी सर्व पोलीस बांधवांनी घेत मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. यानंतर राजस्थानी मंगल भवन येथे शोभायात्रा पोहोचल्यानंतर भक्ती बहुमंडळ यांच्याकडून अंजली यांचे जोरदार स्वागत करण्यात आले व गुरु महाराजांच्या मंगलाचरणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यातुन आरोपीचा जामीन अर्ज मंजुर-ॲड. विकास बडे

बीड । प्रतिनिधी

प्रस्तुत प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, सदर प्रकरणातील फियीदी ही आरोपीची आई आहे. दिनांक ०७.०७.२०२३ रोजी गु.र.नं. ३१३/२०२३ आष्टी पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यात आली की, फियर्यादीचा पती कांतीलाल नरवडे व फिर्यादीचा मुलगा आरोपी योगेश नरवडे हे दिनांक ०७.०७.२०२३ रोजी मजुरीचे काम करुन घरी येतांना सोबत दारु पिऊन आले व त्यावर दारु संपल्यामुळे यातील आरोपी योगेश नरवडे याने वडील मयत कांतीलाल नरवडे यांना दारु पिण्यासाठी अजुन पैसे मागितले, वडीलाने पैसे न दिल्याने आरोपीने मयत वडील कांतीलाल नरवडे यांच्या पायावर, हातावर व इतर ठिकाणी लाकडी दांड्याने मारहान केली, गंभीर मार लागल्याने फिर्यादीचे पती बेशुध्द पडले, त्यावर आरोपी व फिर्यादी यांनी मिळुन कांतीलाल नरवडे यांना आष्टी येथे दवाखान्यात नेले. परंतु मार जास्त असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नगर येथे घेऊन गेले. त्यानंतर ससुन हॉस्पीटल पुणे येथे उपचाराकामी नेण्यात आले, परंतु तेथे उपचारा दरम्यान ते मयत झाले. त्यानंतर दिनांक १०.०७.२०२३ रोजी मयत कांतीलाल नरवडे यांची पत्नी यांनी स्वतःच्या




मुलावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा पोलीस स्टेशन आष्टी येथे दाखल केला.

सदर प्रकरणात ॲड. विकास भास्करराव बडे यांनी आरोपीचे वतीने बीड न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. ॲड विकास बडे यांचा भक्कम युक्तीवाद पाहता मा. न्यायालयाने सदर आरोपीचा जामीन अर्ज मंजुर करुन आरोपीस जामीन देण्यात आला. आईने स्वतःच्या मुलावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केल्याने परिसरातील सर्व नागरीकांचे सदर प्रकरणाकडे लक्ष लागुन होते. सदर जामीन अर्ज मंजुर झाल्यामुळे ॲड. विकास बडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ माजलगाव शहरात भाजपा महायुतीचा झंजावात भाजपा युतीच्या नेत्यांनी बांधली वज्रमूठ

**भाजपा महायुतीचा माजलगावात प्रचारास शुभारंभ**

**माजलगाव । प्रतिनिधी**

**दि २७ एप्रिल शनिवार रोजी सकाळी १०. वाजता हनुमान मंदिर हनुमान चौक माजलगाव येथून भारतीय जनता पार्टी महामहायुतीच्या बीड लोकसभेच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ माजलगाव भाजपा महायुतीच्या वतीने श्री हनुमान मंदिरात नारळ वाढउन प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.**

यावेळी भाजपा नेते रमेश आडसकर, भाजपा विधानसभा निवडणूक प्रमुख मोहन जगताप, डॉ प्रकाश आनंदगावकर , तालुकाध्यक्ष अरुण राऊत नितीन नाईकनवरे, बबन सोळंके डॉ प्रशांत पाटील , ज्ञानेश्वर मेंडके , नानाभाऊ शिंदे संतोष यादव डॉ अशोक तिडके , सुरेश दळवे दीपक मेंडके , शरद यादव, ईश्वर खुरपे बाळू क्षिररसागर प्रल्हाद दळवी, शिवसेना तालुका अध्यक्ष तुकाराम येवले पापा सोळंके अभिजीत कोंबडे ,



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अच्युत लाटे नासेर खान पठाण राहुल लंगडे विजय शिंदे बबन शिरसट ज्ञानेश्वर सरवदे राम गायकवाड विनायक रत्नपारखी दत्ता महाजन राम जगताप गौरी देशमुख छाया कुलकर्णी रूपाली कचरे संध्या भांडेकर , प्रभाकर कुलथे ,आनंत शेंडगे , सिद्धू राठोड रवी गायकवाड बाबासाहेब आगे रमेश शेंडगे सुरेश एरंडे आनंत जगताप श्रीकांत मेंडके यांच्यासह विविध भाजपा राष्ट्रवादी शिवसेना रिपाई सह महायुतीचे नेते पदाधिकारी शक्ती प्रमुख बहुसंख्येने उपस्थित होते.

माजलगाव शहरातील हनुमान मंदिर येथून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक जुना मोंढा बीड रोड ,व्यापारपेठ पर्यंत भाजपा युतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचे पत्रक वाटप करण्यात आले व सर्व मतदारांना विनंती करण्यात आले की नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी व जिल्ह्याचा भरगोस विकास करण्यासाठी मतदान रुपी आपले आशीर्वाद पंकजा मुंडे यांना देऊन पंकजा मुंडे यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे अधी विनंती मतदार, नागरिकांना करण्यात आली.

# लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ जिवाचीवाडी परिसरात कॉर्नर बैठका घेऊन केली मताची मागणी

शनिवार दि.२७ एप्रिल रोजी भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या विडा सर्कल मधील जिवाचीवाडी येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमीत्त अभिवादन भाजपाचे भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत (बापू ) मुंडे यांनी केले व उपस्थित बौध्द बांधवांना जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. जिवाचीवाडी येथिल चौकात असलेल्या लोकनेते स्व.गोपीनाथराव चौकातील मुंडे साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुण उपस्थित मतदार बांधवांना बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ जिवाचीवाडी,



राणुबाईचीवाडी,तुकुचीवाडी येथिल नागरीका सोबत बैठका घेऊन चर्चा करुन पंकजाताईंना मताधिक्य देण्याची मागणी करताना भाजपाचे भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत (बापू ) मुंडे,सरपंच दिपक काळे,उपसरपंच सत्यनारायण चौरे,माजी सरपंच संजय कुटे, शिवाजी यादव,बापू काळे यावेळी उपस्थित होते.



**माजलगाव/प्रतिनिधी**

**माजलगाव येथील संजीवनी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ ज्ञानेश्वर गिलबिले यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात सर्व पत्रकाराने मिळुन साजरा केला डॉ ज्ञानेश्वर गिलबिले हे खरोखर चांगल्याप्रकारे पेशंटची काळजी घेतात काळजी पूर्वक पेशंटकडे ते लक्ष देऊन होईल तितके चांगल्या प्रकारे ते पेशंटला उपचार देतात म्हणून माजलगाव शहरात आणि परिसरात त्यांची खुप मोठी ख्याती झाली आहे त्यांच्या कडे केवळ माजलगावच नव्हे तर आजुबाजुच्या तालुक्यातील सुध्दा पेशंट येत आहेत ते माजलगाव मध्ये एक बरं यापैकी एक आहेत म्हणून या त्यांच्या कार्याची दखल घेऊन आम्ही सर्व पत्रकार बंधुनी त्यांनां जाऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन त्यांचा वाढदिवस साजरा केला**

# ही लढाई आपल्याला जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायचीयं

## भाशिप्र संस्थेच्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडेंना विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार




## जातीपातीच्या भिंती तोडून प्रज्ञावंतांनी मतदार जागृतीसाठी योगदान द्यावे

बीड । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि मुंडे परिवाराचे वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध आहेत. तुम्ही सर्व सुशिक्षित आणि प्रज्ञावंत आहात. प्रज्ञावंत मतदार म्हणून तुम्ही नक्कीच जिल्ह्याच्या विकासाला योगदान देण्यासाठी तुमचे अमूल्य मत मला द्याल ही खात्री आहे, मात्र तुमच्यासह आपल्यासाठी नकारात्मक असलेली वीस मते तरी प्रत्येकाने आपल्या बाजूने मिळवण्यासाठी भाजपची विचारधारा अन् देश विकासाचे धोरण मतदारांपर्यंत पोहचवावे असे आवाहन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केलं.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या आशीर्वाद मंगल कार्यालयात झालेल्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडे बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ.हेमंत वैद्य, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रवक्ते राम कुलकर्णी, उमेश जगताप,चंद्रकांत मुळे आदींसह केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, संघ विचारसरणीत मोठे झालेल्या गोपीनाथराव मुंडे यांची मी कन्या आहे. त्यामुळे शिस्त आणि माझे कर्तव्य मला माहित आहे. या निवडणूकीत जातीपातीच्या भिंती तोडण्यासाठी प्रज्ञावंतांनी योगदान द्यावे. भाशिप्र संस्थेच्या सर्व प्रज्ञावंतांनी आपल्याविरुद्ध असलेली नकारात्मक मते सकारात्मक करण्यासाठी काम करावे. बीड जिल्ह्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मी मते मागत आहे. त्यात तुम्ही तुमचे सत्पात्री दान टाकावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. आपण कोणीही जातीवादाला थारा देत नाहीत पण निवडणूक आली की, मुद्दाम विरोधकांकडून जात पुढे आणली जाते. यातून जोडलेली माणसं बाजूला करण्याच काम केलं जातं. मात्र ही लढाई आपल्याला बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायची आहे. पुन्हा एकदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना विराजमान करण्यासाठी आपण सर्वांनी या निवडणूकीत भाजप-महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. राजकारणात मुंडे परिवाराने कधीही जात-धर्माचा भेदभाव केला नाही याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

प्रारंभी प्रास्ताविक भाशिप्रचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे यांनी केले.दिवंगत गोपीनाथ मुंडे साहेबांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेसाठी भरीव काम केले आहे हे आम्ही कधी विसरणार नाही.भा.शि.प्र.संस्थेच्या प्रत्येक संस्कार केंद्रातून पंकजाताई मुंडे यांना अधिकाधिक मतदान मिळवण्यासाठी आम्ही सर्व जण सामूहिक योगदान देऊ असं मुळे म्हणाले.याप्रसंगी राम कुलकर्णी म्हणाले, माझी माणसं, माझा जिल्हा या भावनेने पंकजाताई मुंडे काम करतात.भा.शि.प्र ही संस्था आणि मुंडे परिवाराचा खूप वर्षांचा ऋणानुबंध आहे. शिक्षण क्षेत्रात भरीव काम आपल्या संस्थेला मुंडे साहेबांच्या आणि नंतर पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना करता आले आहे त्यामुळे या निवडणुकीत पंकजाताई यांना प्रचंड मतांनी आपल्याला निवडून द्यायचे आहे असा संकल्प आम्ही सर्वांनी केला आहे पंकजाताई यांचा विजय निश्चित आहे फक्त त्या किती लाख मतांनी निवडून येतील याची आम्हाला प्रतीक्षा आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी हेमंत वैद्य म्हणाले, भा. शि. प्र. संस्थेच्या सर्व कर्मचार्यांनी या निवडणुकीत मतदार जागृतीचे काम करावे. देशाला पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच सरकार सत्तेत आणण्यासाठी बीड लोकसभा मतदार संघात पंकजाताई मुंडे यांना निवडून देण्यासाठी सर्व प्रज्ञावंतांनी योगदान देवून मतदान जागृती करावी. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था कायम पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, ताईंचा विजय निश्चित आहे असा विश्वास हेमंत वैद्य यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन उमेश जगताप यांनी केले.

# उद्या पासुन धानोरा वंजारवाडी फक्राबाद येथील आणखेरी देवी यात्रा उत्सवास सुरवात




**जामखेड । प्रतिनिधी**

**जामखेड तालुक्यातील नवसाला पावणाऱ्या मौजे धानोरा, फक्राबाद, वंजारवाडी तसेच पंचक्रोशी चे आराध्य दैवत आसलेल्या श्री. अणखेरी देवी यात्रा उत्सव चैत्र शुध्द तृतीया चतुर्थीला म्हणजे दि २७ व २८ एप्रिल रोजी सुरवात होणार आहे. यायात्रेत भव्य कुस्त्यांचा आखाडा देखील भरवण्यात आला आहे.**

श्री आणखेरी देवी यात्रा उत्सवानिमित्त दोन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असुन दि २७ एप्रिल रोजी पहाटे तीन वाजता मौजे कुसळब ता. पाटोदा याचा महापूजेचा मान असतो तेथील भाविक भक्त कैलास महाराज व इतर याच्या हस्ते महापूजा होते, तसेच याच दिवशी पहाटे चार वाजता पंचक्रोशीतील सर्व महीला दंडवतासाठी येतात दिवसभर यात्रेस येणारे भाविक हे दर्शन घेतात. सायंकाळी ६ वा. मानाच्या काढ्या व छबिना (पालखी) मिरवणूक सवाद्य फक्राबाद, धानोरा, वंजारवाडी या तिन हि गावामधून काढण्यात येते. तसेच रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १२ वाजता देवीची पालखी निघते दि २८ रोजी पहाटे ही पालखी ५ वा देवीवर येते त्यानंतर पालखीची सांगता होते.

रविवार दि २८ रोजी याच ठिकाणी सायंकाळी ४ वा कुस्त्यांचा हगामा भरवण्यात येतो. यात्रेसाठी बाहेरगावहून मुंबई, पुणे व इतर शहरातून भाविक दर्शनासाठी येतात. यात्रा उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. तसेच श्री क्षेत्र आणखेरी देवी मंदिर धानोरा ट्रस्ट चे अध्यक्ष रंभाजी अढाव, सचिव रमेश तुपेरे, उपाध्यक्ष सोपान जायभाय, सदस्य गोपीचंद काळे, तुळशीराम पिंपळे, भगवान उबाळे, रावसाहेब जायभाय, अविनाश अढाव, भाऊसाहेब अढाव, गहिनीनाथ जायभाय, चंद्रकांत क्षिरसागर व पोलीस पाटील योगीनाथ जायभाय यांनी भाविकाना यात्रा उत्सव येण्याचे आवाहन केले आहे. या यात्रा उत्सवास कैलास महाराज पवार यांचे विषेश सहकार्य लाभले आहे. यात्रेला अंदाजे ४ ते ५ लाख भाविक दर्शनासाठी येतात.

हेमाडपंती आसलेले श्री आणखेरी देवीचे मंदिर होते या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी तत्कालीन माजी आमदार सदाशिव लोखंडे यांनी पहिले सभामंडप देले त्यामुळे या मंदिराच्या विकासाला सुरुवात झाली त्यांनतर माजी पालकमंत्री आमदार प्रा राम शिंदे यांनी १ कोटी १९ लाख रुपयांचा निधी देऊन या मंदिराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला तसेच आमदार रोहित पवार यांनी १३ लाख रुपयांचा निधी दिला आहे. श्री आनखेरी देवी या ट्रस्टची स्थापना करण्यात आली आणि सर्वीना विश्वासात घेऊन ट्रस्टचे अध्यक्ष रभांजी आढाव व सचिव रमेश तुपेरे व सर्व संचालकांनी विकासासाठी आपले योगदान दिले त्यामुळे या आणखेरी देवी मंदिराचा विकास होत आहे.

# पुढाऱ्यांना निवडणुकीचे वेध लागले

शेवगाव (प्रशांत बाफना )शेवगाव तालुक्यातील पुढाऱ्यांना निवडणुकीचे वेध लागले आहेत. लोकसभा निवडणूक ही विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीम असते. कार्यकर्ते व मतदार यांच्याशी सतत सम्पर्क साधून विधानसभा निवडणुकीत विजय मिळावा या हेतूने माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, आ. मोनिकाताई राजळे व महाविकास आघाडी चे भावी आमदार प्रताप काका ढाकणे यांनी तालुका भर सम्पर्क अभियान राबविले आहे. घुले पाटील, आ. राजळे ताई खासदार विखे पाटील यांना मताधिकय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. प्रताप राव ढाकणे आ. निलेश लंके यांचा जोरदार प्रचार करत आहेत. पण शेवगाव तालुक्यातील बुलंद तोफ म्हणून ज्यांना ओळखलं जातेय त्या माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदाताई काकडे यांनी मात्र अद्याप त्यांची भूमिका स्पष्ट का केली नाही? कार्यकर्त्यात उलट सुलट चर्चा होत आहे. मागच्या लोकसभा निवडणुकीत सौ. हर्षदा काकडे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांना साथ दिली होती. त्यांनी त्या वेळी आ. संग्राम भय्या जगताप यांचा प्रचार करून विखे पाटील यांना जाहीर विरोध केला होता. त्या नंतर विधानसभा निवडणुकीत आ. मोनिका ताई राजळे यांना उमेदवारी मिळू नये म्हणून प्रचंड विरोध केला होता. आता पुन्हा खासदार विखे पाटील मैदानात उतरले आहेत. सौ. काकडे ताई तुतारी ला साथ देणार काय? कार्यकर्ते चर्चा करीत आहेत. काही दिवसापूर्वी शेवगाव शहर व तालुक्यातील भाजप कार्यकर्ते व भाजप चे जेष्ठ नेते सुनील ऊर्फ बंडू शेठ रासने यांनी विखे पाटील कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नाहीत. सर्व सामान्य कार्यकर्त्यांना भेटत नाहीत म्हणून मुंबई भाजप कार्यालयात जाऊन राजीनामा दिलेला आहे. एकेकाळी माजी आ. तुकाराम गडाख यांचे समर्थक असलेले रासने लोकप्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांचा जनसपंर्क दांडगा आहे. माजी खासदार दिलीप गांधी यांचे ते कट्टर समर्थक होते. अचानक रासने यांनी राजीनामा दिल्यामुळे खासदार विखे पाटील यांचा तोटा होणार? अशी नागरिकांत चर्चा आहे. महाविकास आघाडीचे आ. निलेश लंके यांनी राबवलेल्या सम्पर्क अभियान ला तालुक्यातील जनतेने चांगला प्रतिसाद दिला असल्याचे निदर्शनास येत आहे. लोकसभा निवडणूक देशाचे भवितव्य ठरविणारी निवडणूक आहे. महाविकास आघाडी, महायुती च्या प्रचाराला सुरुवात झाली

हर्षदा ताई काकडे भाजप च्या जेष्ठ नेत्या असताना सुद्धा त्यांना वारंवार विधानसभा निवडणुकीत संधी नाकरण्यात आल्या मूळे काकडे ताई भाजपात नाहीत. मात्र शेवगाव, पाथर्डी मतदान संघात त्यांचा जनसपंर्क दांडगा आहे. त्यांच्या शिक्षण संस्था आहेत. जनतेच्या रास्त समस्या सुटाव्यात म्हणून त्या सतत रस्त्यावर उतरून आंदोलन करत असतात. जनशक्ती मंच ही त्यांची सन्घटना आहे. त्या मूळे त्यांच्या निर्णयाकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# पंकजा मुंडेंनी नाशिक लोकसभेबाबत वक्तव्य घेतलं मागे

## म्हणाल्या, नासमझ लोकांनी वेगळाच अर्थ लावला मनातली सल बोलून दाखवत कोणावर साधला निशाणा?


बीड । प्रतिनिधी

नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीत अजूनही उमेदवार ठरलेला नाही. त्यातच बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी नाशिकच्या जागेवर प्रीतम मुंडेंना उभे करेल, असे म्हटले होते. यावरून महायुतीत मोठी खळबळ उडाली होती. आता पंकजा मुंडे यांनी आपले वक्तव्य मागे घेतले आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरु आहे. दररोज नवनवीन उमेदवारांची नावे समोर येत आहेत. हेमंत गोडसे, छगन भुजबळ, अजय बोरस्ते राहुल ढिकले यांच्या नावानंतर प्रीतम मुंडे यांचे नाव अचानक चर्चेत आले. यावरून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी पंकजा मुंडे यांना टोलाही लगावला होता.

काही नासमझ लोकांनी वेगळा अर्थ काढला : पंकजा मुंडे

पंकजा मुंडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बीडमध्ये जाहीर सभा घेतली होती आणि या सभेमध्ये बोलत असताना त्यांनी प्रीतम मुंडे यांना मी नाशिकमधून उभा करेल असं म्हटलं होतं. मात्र प्रीतम मुंडे यांना नाशिक मधून उभा करणार हे मी सहज बोलून गेले. काही नासमझ लोकांनी याचा वेगळा अर्थ काढला. नाशिक हे प्रीतम मुंडे यांचे सासर आहे. त्यांना सासरला पाठवता येईल, अशा आशयाने मी बोलेले. मात्र काही लोकांचे स्वागताचे मेसेज देखील आले, असे स्पष्टीकरण पंकजा मुंडे यांनी दिले आहे.



### काय म्हणाले होते छगन भुजबळ?

पंकजा मुंडेंच्या वक्तव्यावर छगन भुजबळ म्हणाले होते की, पंकजा मुंडे यांनी आपल्या निवडणुकीत लक्ष द्यावे. आमच्याकडे अनेक उमेदवार आहेत. नाशिकमध्ये तिन्ही पक्षात खूप उमेदवार आहेत, त्यामुळे त्यांनी बीडमध्ये लक्ष द्यावे, असा टोला त्यांनी लगावला होता. यामुळे नाशिक लोकसभा मतदारसंघावरून महायुतीच्या दोन ओबीसी नेत्यांमध्ये जुंपल्याचे दिसून आले होते. आता पंकजा मुंडे यांचे वक्तव्य छगन भुजबळांना प्रत्युत्तर आहे का? अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# बीड मतदारसंघातील बुथप्रमुखांना पंकजाताई मुंडेंनी दिला कानमंत्र

## घरोघरी जावून मतदारांशी संवाद साधा, अधिकाधिक मतदान मिळवा

## बुथप्रमुखांनी दिला ऐतिहासिक मताधिक्य मिळवून देण्याचा शब्द



बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक आपल्या जिल्ह्याच्या पुढील भवितव्याची नांदी ठरणारी आहे. त्यामुळे गावा-गावात अन् घरा-घरात जावून मतदारांशी संवाद साधा. देशपातळीवर सक्षम नेतृत्व आणि विकासाची गंगा आणण्यासाठी अधिकाधिक मतदान मिळवा. आज, आतापासून प्रचार कालावधी संपेपर्यंत प्रत्येकाच्या घरी जा व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मतं मागा, असे आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

बीड मतदार संघातील बुथप्रमुखांचा मेळावा आज आशीर्वाद लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह बीड मतदार संघातील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मी कधीच कोण्या व्यक्तीच्या विरोधात नसते तर मी भूमिकेच्या विरोधात असते. ही निवडणूक जिंकण्यासाठी बुथप्रमुखांनी आपापल्या गावांतील घरोघरी जावून जिल्ह्याच्या विकासासाठी मतदान मागावे, प्रेमानं जग जिंकता येतं. त्यामुळे प्रत्येकांशी संवाद अन् संपर्क कायम ठेवा. भाजपची विकासाची गाथा मतदारांपर्यंत पोहचवा असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. मी जिल्हा पिंजून काढत आहे. बैठका, मेळावे, गाठीभेटी, पदयात्रेतून अधिकाधिक मतदारांपुढे जावून मते मागत आहे, त्यामुळे मागे हटू नका, सक्रीयतेने व्यापक मताधिक्यासाठी बुथप्रमुखांनी काम करावं. आपला बुथ प्रत्येकाने सांभाळावा असेही त्या म्हणाल्या.

बुध्दीभेदाच्या प्रचाराला बळी पडू नका

मुंडे परिवाराने कधीच जातीवादाला थारा दिलेला नाही. त्यामुळे विरोधकांकडून सुरु असलेल्या बुध्दीभेदाच्या प्रचाराला बळी पडू नका, प्रत्येक घटकांपर्यंत जावून त्यांना जिल्ह्याच्या विकासाची भूमिका तसेच देशपातळीवर पक्षाची भूमिका विषद करा असे सांगत पंकजाताई म्हणाल्या, बीड मतदार संघात आपल्या सर्वांकडून खूप सकारात्मक कामाची अपेक्षा मला आहे. गावागावात आपल्याला अधिकचे मतदान कसे मिळेल याकडे लक्ष द्या व त्याप्रमाणे काम करा. लोकांमध्ये जा,त्यांना समजावून सांगा असे आवाहन पंकजाताईंनी केले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी बीड मतदार संघातील गावांचा बूथनिहाय बूथ प्रमुखांकडून आढावा घेतला. काही चुकलं असेल तर तुम्ही दुरुस्त करा, पण मनापासून कामाला लागा, विजय आपलाच आहे असा विश्वासही त्यांनी बुथप्रमुख,कार्यकर्त्यांना दिला. यावेळी बीड मतदारसंघातील बुथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महेबूब भाई अपने घर शिषे के छोड कर

# दुसरों घर पथ्थर फेंकने कहां चले? - रमीज भाई शेख

## नेत्यांच्या पुढे पुढे करून पद मिळवता येते, पण नगरपंचायत निवडणुकीत गल्लीतला उमेदवार निवडून आणायला जनमतही लागते

**बीड । प्रतिनिधी**

**महेबूब भाई तुम्हारे उपर बलात्कार, अट्रोसिटी जैसे गंभीर मामलो के केसेस चल रहे है, और चुनाव का मौसम बिगाडने के चक्कर मे, राज्य के बडे नेता पर किचड उच्छालने चले, अपने घर शिषो के छोड कर दुसरो के घर पे पथ्थर फेंकने कहां चले? अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हा कार्याध्यक्ष रमीज भाई शेख यांनी शिल्लक राष्ट्रवादीचे विकृत नेते महेबूब शेख यांना खडे बोल सुनावले आहेत.**

महेबूब भाई, मोठ्या नेत्यांच्या कानांत लावलाव्या करून, त्यांच्या पुढे पुढे करून पद मिळवता येते मात्र स्वतःच्या गल्लीत नगर पंचायत निवडणुकीत आपला उमेदवार निवडून आणता येत नाही, तिथे जनमत सोबतीला असावे लागते, असा टोलाही रमीज शेख यांनी लगावला आहे.

राक्षसभुवन येथील बैठकीत बोलताना महेबूब शेख यांनी धनंजय मुंडे यांच्यावर वैयक्तीक पातळीवर टीका केली होती. 'इटका जवाब पथ्थर से मिलेगा' असे म्हणत रमीज शेख यांनी महेबूबच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे. आपल्या प्रसिद्धी पत्रकात ते पुढे म्हणतात की, महेबूब शेख याच्या पाठीमागे स्वतःचे १० कार्यकर्ते किंवा १०० मतदान सुद्धा नाही, अनेकांची लूट, फसवणूक असे आरोप आणि बलात्कार, अट्रोसिटी सारखे केसेस त्यांच्यावर सुरू आहेत. मात्र आपली उंची किती याचे भान विसरून राज्यात आपल्या कर्तबगारीने प्रसिद्ध असलेल्या आमच्या नेत्यांवर वैयक्तिक टीका करताना महेबूब यांनी



आपली पातळी व उंची तपासावी, अन्यथा चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असेही रमीजभाई शेख यांनी म्हटले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT